# गतिमान आरामदायी प्रवास



भारत २१ व्या शतकातील तंत्रज्ञान स्वीकारतो आहे. तंत्रज्ञानाच्या जोरावर भारत आता जगात आपली ओळख तयार करतो आहे. पूर्वी आधुनिक तंत्रज्ञान आयात करणारा भारत आता तंत्रज्ञानाची निर्यात करायला लागला आहे. पॅसेंजर, मेल, एक्सप्रेस गाड्यांचा जमाना आता बदलला आहे. शताब्दी, राजधानी एक्सप्रेस सुरू झाल्या. रेल्वेत पायाभूत सुविधा निर्माण करण्यात यश आले आहे. भारतात बुलेट ट्रेनचे काम सुरू झाले आहे. ती सुरू व्हायला अजून सहा वर्षे आहेत. मोनोरेल, मेट्रोचा विस्तार वाढतो आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्याच्या सभेत पुन्हा बुलेट ट्रेनचे स्वप्न दाखवले आहे. यापूर्वी महाराष्ट्रातून मुंबई-अहमदाबाद, मुंबई-हैदराबाद आणि मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन सुरू करण्याची घोषणा झाली होती. त्यापैकी फक्त मुंबई-अहमदाबादचे काम सुरू झाले आहे. मोदी एकीकडे बुलेट ट्रेनचे स्वप्न दाखवत असताना दुसरीकडे वंदे भारत मेट्रोची तयारी सुरू झाली आहे. ही ट्रेन लोकल ट्रेन म्हणून काम करेल. त्याचप्रमाणे वंदे भारत मेट्रोमध्ये जास्तीत जास्त सीटस असतील. वंदे भारत मेट्रोची ओळख इंटरसिटी किंवा पॅसेंजर ट्रेन म्हणूनही होऊ शकते. वंदे भारत मेट्रो ट्रेनचे दरवाजे स्वयंचलित असतील. वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरू झाल्यावर दरवाजे आपोआप बंद होतील आणि ट्रेनचा दरवाजा फक्त पुढच्या स्टेशनवर उघडेल. रेल्वे ज्या पद्धतीने वंदे भारत मेट्रोची व्यवस्था करत आहे, त्यावरून भाड्यांबाबत लोकांना कोणतीही अडचण येणार नाही. त्याचे कारण लोक आता अत्याधुनिक, वेगवान आणि आरामदायी सुविधेसाठी पैसे मोजायला तयार आहेत. सध्या रेल्वेकडून 'वंदे भारत एक्स्प्रेस सेमी-हाय स्पीड ट्रेन'च्या रूपात भाडे उपलब्ध आहे. दिल्लीसह संपूर्ण देशात ती यशस्वीपणे सुरू आहे. रेल्वे सेवेचा विस्तार करताना जवळच्या शहरांना जोडण्यासाठी 'वंदे भारत मेट्रो ट्रेन'ही लवकरच धावणार आहे. दोन मोठ्या शहरांदरम्यान धावणाऱ्या 'वंदे भारत मेट्रो'ची चाचणी जुलैमध्ये केली जाणार आहे. यामध्ये स्वयंचलित दरवाजे आणि १२ डब्यांचा समावेश आहे. प्रवाशांच्या संख्येनुसार, नवीन वंदे भारत मेट्रोच्या डब्यांची संख्या १२ वरून १६ केली जाऊ शकते. या ट्रेनमध्ये अनारक्षित किंवा सामान्य श्रेणीतील प्रवाशांच्या दैनंदिन हालचालींना उच्च प्राधान्य दिले जाईल. मुख्यतः वंदे भारत मेट्रो देशातील १२४ शहरांना जोडेल आणि शंभर ते अडीचशे किलोमीटरच्या परिघात धावेल.

वंदे भारत मेट्रो वाहतुकीसाठी लखनऊ-कानपूर, आग्रा-मथुरा आणि तिरुपती-चेन्नई असे अनेक मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर प्रकल्प राबविण्याचे धोरणही भारतीय रेल्वेने तयार केले आहे. अहवालानुसार, पहिली ट्रेन मे पर्यंत तयार होईल. पूर्ण वातानुकूलित वंदे मेट्रो ताशी १३० किलोमीटर वेगाने प्रवास करेल आणि प्रत्येक डब्यात २८० लोक प्रवास करू शकतील. या ट्रेनच्या डब्यात शंभर लोकांची बसण्याची व्यवस्था असून १८० लोक उभे राहू शकतात. वंदे मेट्रोमध्ये प्रवाशांना लोको पायलटशी बोलण्यासाठी 'टॉक बॅक सिस्टीम', सुरक्षेसाठी 'फेअर-स्मोक डिटेक्शन सिस्टीम' आणि कवच सिस्टीम यासारखी अनेक प्रगत वैशिष्ट्ये असतील. वेगवेगळ्या शहरांतील लोकांच्या फायद्यासाठी रेल्वे विभाग ही ट्रेन विकसित करत आहेत. एका शहरातून दुसऱ्या शहरात कामासाठी जाणाऱ्यांची सोय होणार आहे. वातानुकूलित डबे असलेल्या वंदे मेट्रोमुळे सर्वसामान्यांनाही आरामात प्रवास करता येईल. विशेषतः या मार्गामुळे दोन राज्यांना जोडण्यासही मदत होणार आहे. वंदे भारत मेट्रो व्यतिरिक्त, ५५० किलोमीटरपेक्षा जास्त अंतर कव्हर करणाऱ्या मार्गांवर वंदे भारत स्लीपर ट्रेन आणि १००-५५० किलोमीटरच्या आत चेअर कार वंदे भारत एक्सप्रेस गाड्या चालवण्याची तयारी केली जात आहे. नवीन वंदे भारत स्लीपरला राजधानी एक्स्प्रेस गाड्यांचा पर्याय म्हणून ओळखले जात आहे. चेन्नई येथील 'इंटिग्रल कोच फॅक्टरी'च्या सहकार्याने बेंगळुरूमधील 'भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड'च्या उत्पादन युनिटमध्ये या ट्रेनची निर्मिती केली जात आहे. वंदे भारत मेट्रोमध्ये उभ्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशाला धक्का लागला, तरी प्रवाशी पडणार नाही. त्याचे कारण प्रवाशांना लगेच 'कॅच स्ट्रिप' दिली जाईल. भारतीय रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी देशात 'वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन' सुरू केली होती आणि तेव्हापासून आता अनेक शहरांमधून वंदे भारत ट्रेन चालवल्या जात आहेत. जुलै महिन्यात देशाला पहिली वंदे मेट्रो मिळणार आहे. ही वंदे मेट्रो सामान्य दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी चालवली जाणार आहे. दोन मोठ्या शहरांना जोडण्यासाठी चालवण्यात येणाऱ्या 'इंटरसिटी एक्स्प्रेस'च्या धर्तीवर ही मेट्रोही धावणार आहे. देशातील ज्या भागात खूप गर्दी असते आणि प्रवास करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशा ठिकाणी ही मेट्रो धावेल. दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा त्रास कमी करण्यासाठी ल्वेने वंदे मेट्रो चालवण्याचा विचार केला आहे.

देशातील पहिली वंदे मेट्रो ट्रेन जुलै महिन्यात रुळांवर धावण्यास सुरुवात होणार आहे. सुरुवातीला दोन-तीन महिने महिने चाचणी तत्वावर ती चालवली जाईल. त्यानंतर चाचणी यशस्वी झाल्यास इतर मार्गांवरही चालवण्याचा निर्णय घेतला जाईल. सध्या तरी वंदे मेट्रो ट्रेनच्या चाचणीसाठी मार्ग निवडलेला नाही. आतापर्यंत एकूण ५० वंदे मेट्रो ट्रेन तयार आहेत. देशातील पहिली वंदे मेट्रो अतिशय वेगाने धावणार आहे. वंदे मेट्रो ट्रेन पहिल्या टप्प्यात देशातील १२४ शहरांना जोडणार आहे. आतापर्यंत सुमारे ५० ट्रेन तयार आहेत. चाचणी यशस्वी झाल्यास, आणखी ३०० हून अधिक महानगरांना जोडण्यासाठी वंदे मेट्रो ट्रेन सुरू केली जाईल. सहा वर्षांत देशभरात ३०० हून अधिक वंदे मेट्रो चालवण्याची तयारी सुरू आहे. या महानगरांमधील डब्यांची संख्या गरजेनुसार ठरवली जाईल. ती मेट्रो आणि इंटरसिटी एक्स्प्रेसपेक्षा जास्त वेगाने धावेल. वंदे मेट्रोला चार, पाच, १२ आणि १६ डबे असतील. ज्या मार्गावर जास्त प्रवासी असतील त्या मार्गावर १६ डब्यांची मेट्रो असेल. जिथे कमी प्रवासी असतील, तिथे चार ते पाच ट्रेनचे डबे असतील. ती शहरे वंदे मेट्रोद्वारे जोडली जातील, जी जास्तीत जास्त २५० किलोमीटर अंतरावर असेल. वंदे मेट्रोमधील आसनांच्या दरम्यान रुंद मार्गासह प्रत्येक कोचची क्षमता २८० प्रवासी असेल. त्यात शंभर आसन क्षेत्रांचा समावेश आहे. वंदे मेट्रोला प्रत्येक डब्यात १४ सेन्सर्ससह स्वयंचलित दरवाजे, शौचालये, वातानुकूलन आणि धूर शोधण्याची यंत्रणा असेल. वंदे मेट्रो लखनऊ-कानपूर, आग्रा-मथुरा, तिरुपती-चेन्नई इत्यादी दरम्यान धावण्याची अपेक्षा आहे. भारतीय रेल्वेकडून या ट्रेनचे आधुनिकीकरण केले जात आहे. त्याच अनुषंगाने वंदे भारत ट्रेनही दाखल झाल्यामुळे प्रवास आणखी सुकर झाला आहे. याशिवाय बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा २०२६ पर्यंत सुरू होण्याची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत भारतीय रेल्वेमध्ये पूर्वीच्या तुलनेत बरीच सुधारणा होत आहे. सर्व रेल्वे ट्रॅकच्या विद्युतीकरणाचे कामही जवळपास पूर्ण झाले आहे. ट्रेनमध्ये इकॉनॉमी कोच बसवून प्रवाशांची सोय सुधारण्याचे कामही करण्यात आले आहे. सध्या अनेक रेल्वे स्थानकांचाही कायापालट करण्यात आला आहे. सध्या, ट्रेनमध्ये वेटिंग तिकीट मिळणे ही एक समस्या आहे. ही संपवण्यासाठी भारतीय रेल्वेकडूनही काम केले जात आहे. आता ट्रेनचा वेग पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय वाढला आहे. ट्रेनचा कमाल वेग ताशी १३० किलोमीटर निश्चित करण्यात आला आहे. २०३२ पर्यंत वेटिंगची समस्या पूर्णपणे संपुष्टात येईल. अधिक संख्येने डबे, ट्रॅक आणि लोको बांधल्यानंतर वेटिंगचा प्रश्न नगण्य होईल. त्यानंतर सर्वांना फक्त कन्फर्म तिकिटे मिळतील. दिल्ली मेट्रोप्रमाणे प्रत्येक डब्यात बसण्याची व्यवस्था केली जाईल. प्रवाशांना बसण्यासाठी कंपार्टमेंटच्या मध्यभागी रुंद बाक बसवण्यात येणार आहे. चांगली गोष्ट म्हणजे तिकीट आरक्षित करण्याची गरज नाही, कारण ट्रेन फक्त कमी अंतरासाठी असेल. येत्या काळात वंदे मेट्रो मुंबई लोकलची जागा घेऊ शकेल. तिथे लोकल गाड्यांना सर्वाधिक मागणी आहे. मुंबई लोकलशिवाय दिल्ली, चेन्नई आणि कोलकाता येथेही वंदे मेट्रो धावणार आहे. या ट्रेनचे भाडे किती असेल याबाबत अद्याप काहीही समोर आलेले नाही; पण भाडे सर्वसामान्यांच्या खिशानुसार असेल. जास्त पैसे खर्च न करता आरामात प्रवास करता येईल, असे बोलले जात आहे. ही ट्रेन मेट्रोप्रमाणे धावणार आहे. ही मेट्रो दिवसातून अनेक वेळा धावणार आहे. वंदे मेट्रो शंभर किलोमीटरपेक्षा कमी अंतरावरील शहरांमध्ये धावणार आहे. ही वंदे भारत एक्सप्रेसची कमी अंतराची आवृत्ती आहे. या गाड्या दिवसातून चार ते पाच वेळा एकाच मार्गावर धावतील. या ट्रेनमुळे प्रवाशांना वेगवान शटलसारखा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे नोकरदार लोक आणि विद्यार्थ्यांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जाणे सोपे होणार आहे.

## स्वातंत्र्यलढ्यात ज्यांचा कसलही सहभाग नव्हता तो पक्ष 'भाजप' : शरद पवार

### चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ तासगावमध्ये सभा



**तासगाव/प्रतिनिधी**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना तब्बल सहा महिने तुरुंगात टाकले जाते, ही लोकशाही आहे. हे स्वातंत्र्य आहे का, असा सवाल करत देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांचा कसलही सहभाग नव्हता तो पक्ष भाजप आहे, अशी जहरी टीका शरदचंद्र पवार यांनी केली. तासगाव येथे लोकसभा महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजीत सभेत ते बोलत होते. यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे संजय राऊत, माजी मंत्री, आमदार जयंत पाटील, आमदार सुमनताई पाटील, चंद्रहार पाटील, अरूण लाड, रोहीत आर. आर. पाटील, नितीन बानगुडे पाटील, बजरंग पाटील, ताजुद्दिन तांबोळी, विश्वास पाटील, प्रदीप माने, विशाल शिंदे, ज्येष्ठ नेते शंकरदादा पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पवार म्हणाले, सांगली, सातारा जिल्ह्याने नेहमी आपली आक्रमक भूमिका घेतली आहे. सांगली जिल्ह्याचा इतिहास स्वातंत्र्य सैनिकांचा आहे. देशाच्या प्रेमाप्रती मोठा लढा सांगली जिल्ह्याने दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत असताना सांगली जिल्ह्याने राज्याला दोन चांगली माणसे दिली. ती म्हणजे आर. आर. पाटील व जयंत पाटील. यांनी सत्तेचा वापर करून ग्रामीण भागात पाणी फिरवले. आबांच्या नंतर आता ही जनतेच्या कामाची काळजी रोहीत घेत आहे. हे कौतुकासपद आहे.

मात्र सध्या देशाचा चेहरा बदलतोय. नरेंद्र मोदींच्या हातात देशाचा कारभार आहे. देशाच्या स्वातंत्र्य इतिहासात ज्यांचे काहीच योगदान नव्हते ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या योगदानावर बोलत आहेत,ही घातक गोष्ट आहे. आणि सध्या त्यांच्या हातात देशाची सूत्रे आहेत. त्यांना लोकशाही मान्य नाही. यासाठीच आपल्याला सत्तापालट करायचा आहे. महाराष्ट्राच्या लोकसभेत चंद्रहार पाटील या पैलवानाला पाठवायचे आहे.

संजय राऊत म्हणाले, चंद्रहार पाटील यांना मताधिक्य हवे असेल तर त्याचा प्रमुख मार्ग तासगाव तालुका आहे. आणि यासाठी रोहीत पाटील यांनी पुढाकार घेतला तरच हे शक्य आहे. यासाठीच शरद पवार हे तासगाव मध्ये आले आहेत. शिवसेनेने नेहमीच सामान्य माणसाला ताकद दिली आहे. मात्र सांगलीतील समोरच्या उमेदवाराने शेतकऱ्यांसाठी, सामान्य जनतेसाठी काय केले, हा प्रश्न सांगली जिल्ह्याला पडलाय. सध्या चंद्रहार पाटील यांच्या भीतीने भाजपने योगी आदित्यनाथ, अमित शहा या परराज्यातील लोकांना प्रचारासाठी पाठवले आहे. गेल्या दहा वर्षात भाजपने काय कामे केली, याची ही पावतीच आहे. त्यामुळे त्यांना एवढी भीती बसली आहे.

आमदार जयंत पाटील म्हणाले, सध्या महाविकास आघाडीच्या सर्व जागा निवडून येतील अशी परिस्थिती आहे. सकारात्मक वातावरण आहे. चंद्रहार हा नवीन चेहरा आहे. त्यावर कोणताही डाग नाही. त्यामुळे जसे आबांनी पक्ष आणि पक्षाचे धोरण सोडून कधीच काम केले नाही तसेच आता रोहीत पाटील आणि तालुक्याने करायचे आहे.

चंद्रहार पाटील म्हणाले, एका शेतकऱ्याच्या मुलाला लोकसभेची उमेदवारी देणे हीच महविकास आघाडीची खरी ओळख आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी माझी ही उमेदवारी आहे. वसंतदादा पाटील यांच्या नातवावर भाजपची 'बी टीम' म्हणून उमेदवारी लढवण्याची वेळ आलेली आहे. भाजपचे पाकीट घेऊन पाकीट चिन्हावर त्यांना लढावे लागत आहे.

रोहीत पाटील म्हणाले, पुरोगामी पक्षांनी ही निवडणूक जिंकायची ठरवली आहे. २०१४ पासून महाराष्ट्राच्या विकासाला भाजपकडून जाणून बुजून खुंटा घातला असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राची एवढी दयनीय अवस्था कधीच झाली नव्हती. यामध्ये बदल करायचा असेल तर महाविकास आघाडी शिवाय पर्यायच नाही. चंद्रहार पाटील यांच्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू अणि त्यांना निवडून आणू, असेही ते म्हणाले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

## सत्यजितसिंह पाटणकर यांचा वाढदिवस साजरा होणार नाही



**पाटण / प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांचा शनिवार ४ मे रोजी वाढदिवस आहे . सध्या सातारा लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार आ . शशिकांत शिंदे यांचा निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात असून यासाठी पूर्वनियोजित प्रचार सभा , दौरे , बैठका असल्यामुळे सत्यजितसिंह पाटणकर वाढदिवसानिमित्त पाटण येथील त्यांच्या शिक्षा मॅन्शन या निवासस्थानी शुभेच्छा स्विकारण्यासाठी उपस्थित राहणार नसल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पाटण विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी एका पत्रकाद्वारे प्रसिद्धिस दिली .

या पत्रकात पुढे म्हटले आहे की आपल्या सातारा लोकसभा मतदारसंघाच्या संघासाठी मंगळवार दिनांक ७ मे रोजी मतदान होणार असून आपल्या आपल्या महाविकास आघाडीचे उमेदवार आ. शशिकांत शिंदे यांच्या प्रचाराची धुरा आपल्या नेत्यांसह, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या खांद्यावर आहे , त्यामुळेच सत्यजितसिंह पाटणकर यांचा वाढदिवस यावेळी साजरा करण्याऐवजी आपल्या पाटण विधानसभा मतदारसंघात पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी आपापल्या गावात, विभागात फिरून आ. शशिकांत शिंदे यांच्यासाठी प्रचार करावा.

पान १ वरून

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विशेष पथके स्थापन करावीत

सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी त्याचबरोबर औषधे ठेवण्यात यावी. जिल्हा परिषदेमध्ये एक कक्ष स्थापन करुन या कक्षाचा दूरध्वनी क्रमांक प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करुन द्यावा फिरते आरोग्य पथक तैनात ठेवावे गरज असेल त्या ठिकाणी फिरते आरोग्य पथक पाठवावे.

या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन म्हणाल्या, प्रत्येक मतदान केंद्रावर सोयी सुविधा देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यातील दोन मतदान केंद्रे थीमवर तयार करण्यात येणार आहे. यामध्ये जय जवान जय किसान, कृषी, महिलांसाठी,तरुणांसाठी, दिव्यांगासाठी विशेष मतदान केंद्रे तयार करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागात नागरिकांना मतदान करण्याविषयी मतदानाविषयी करण्याविषयी प्रोत्साहित करण्यात येत आहे, असेही त्यांनी बैठकीत सांगितले.

## देऊर येथे डिजेच्या स्पर्धेतून दोघांवर चाकू हल्ला

देऊर गावच्या हद्दीत एका काळ्या क्रेटा गाडीतून विवेक भोसले रा. निंबळक ता. फलटण, प्रतीक मोरे, यशराज मोरे, अभिजीत मोरे तिघे रा. झिरपवाडी ता फलटण हे गाडीतून उतरले यावेळी यशराज मोरे व अभिजीत मोरे यांनी हातात असलेल्या दगडाने अभिराज बोंद्रे व हेमंत धुमाळ यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी प्रतीक मोरे व विवेक भोसले यांच्या हातात चाकू सारखे हत्यार होते या दोघांनी हेमंत धुमाळ याच्या पोटावर चाकुने वार केले. दरम्यानच्या काळात अभिराज बोंद्रे घाबरून पळत असताना अभिजीत मोरे याने त्याचा पाठलाग केला यावेळी अभीराज बोंद्रे हा खाली पडला असताना अभिजीत मोरे याने धारदार हत्यार्याने बोंद्रे यांच्या पाठीवर व उजव्या पायावर वार करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. घटनेची खबर मिळताच वाठार पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला. जखमीस उपचारासाठी लोणंद येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. घटनेची फिर्याद अभिराज बोंद्रे यांनी वाठार पोलिसात दिली असून तपास पोलीस हवालदार उदय जाधव करीत आहेत.

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे २९ जूनला प्रस्थान

विठ्ठल नगरीत विसावेल. २१ जुलैला श्रींचे चंद्रभागा स्नान, गोपाळपूर काला व श्री विठ्ठल रुक्मणी भेट , पादुकां जवळ विसावा व सोहळा परतीच्या प्रवासासाठी आळंदीकडे निघणार आहे. परतीचा प्रवास २१ जुलै वाखरी, २२ जुलै वेळापूर, २३ जुलै नातेपुते, २४ जुलै फलटण, २५ जुलै पाडेगाव, २६ जुलै (श्रींचे नीरा स्नान)वाल्हे, २७ जुलै सासवड, २८ जुलै हडपसर, २९ जुलै (भवानी पेठ)पुणे, ३० जुलै आळंदी, ३१ जुलै आळंदी नगरप्रदक्षिणा, हजेरी मारुती मंदिर नारळ प्रसाद, श्री माऊलीं मंदिर.

## मोदीची 'गॅरंटी' हुकूमशाहीकडे नेणारी

अभय छाजेड,माजी महापौर कमलताई व्यवहारे, माजी नगरसेविका सुजाता शेट्टी, अविनाश बागवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, अशोक हरणावळ, बाळासाहेब ओसवाल, किशोर रजपूत, सुरज लोखंडे, राहुल तुपेरे, राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार पक्षाचे नेते नितीन कदम, गणेश नलावडे, वैजिनाथ वाघमारे, मृणालिनी वाणी, स्वप्नील खडके, आपचे सुदर्शन जगदाळे, धनंजय बेनकर, मुंबईच्या माजी महापौर निर्मलाताई प्रभावळकर यांच्यासह मित्र पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंधारे म्हणाल्या, विकासाच्या मुद्द्यावर भाजपा मते मागू शकत नाही. भाजपला जनतेला आपण १० वर्षात काय केले हे सांगता आले नाही. तसेचत्यांनी पक्ष फोडले. अनेक पक्षांतील नेते फोडले. एवढेच नव्हे तर बंद पडलेले इंजिन यार्डात आणले. तरीदेखील सातत्याने सगळ्या महायुतीचे प्रचारक मोदींना पंतप्रधान करायचे आहे असे सांगत फिरत आहेत. त्यांना कशासाठी पंतप्रधान करायचे आहे तर राज्यघटना बदलून पुन्हा निवडणूक होऊ देयची नाही यासाठी. त्यांना लोकशाहीच नको आहे. सर्व अधिकार आपल्या हातात ठेवायचे आहेत. त्या पुढे म्हणाल्या, भाजपने ज्या विरोधकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आणि ज्यांच्यावर सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) धाडी पडल्या त्या लोकांचा ते आता प्रचार करीत आहेत. पक्ष फोडणारे आणि कारवाईला घाबरून पक्षांतर करणारे उमेदवार मतदारांनी नाकारावे आणि स्वाभिमानी उमेदवारांना निवडून द्यावे. पुण्यातदेखील भाजपा उमेदवार मोदींच्या नावावर मते मागतात. स्मार्ट सिटीच्या नावाखाली पुण्याची काय परिस्थिती केली आहे. विकास नाही म्हणून फसव्या जाहिरातबाजी करून जनतेची दिशाभूल केली जात आहे. मात्र जनता आता फसणार नाही. रविंद्र धंगेकर यांना संसदेत पाठवून पुण्याचा विकास ते करणार आहेत. सामान्यांचे प्रश्न धंगेकर सोडवणार आहेत. जनता त्यांच्या पाठीशी आहे, असा विश्वास अंधारे यांनी व्यक्त केला.

चंद्रकांत हंडोरे म्हणाले, रविंद्र धंगेकर यांनी कसबा विधानसभा मतदार संघातील भाजपचा किल्ला ढासळून टाकला आहे. आता धंगेकर लोकसभेत विक्रमी मताने नक्की निवडून येणार. भाजपच्या भूलथापांना नागरिक बळी पडणार नाहीत. जीवनावश्यक वस्तूंची महागाई वाढली. गॅसची दरवाढ झाली. मोदींनी एकही आश्वासन पूर्ण केले नाही. भाजपची ही फक्त जुमलेबाजी होती. राज्यघटनेने मुलभूत अधिकार, समानता दिली. राज्यघटना दीपस्तंभा सारखी मार्गदर्शन करीत आहे. या सत्ताधाऱ्यांनी न्याय व्यवस्था धोक्यात आणली आहे असे ते यावेळी म्हणाले.

या सभेला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## कोणत्याही परिस्थितीमध्ये संविधान बदलले जाणार नाही : रामदास आठवले

यांनी जपला.

**■ मोहोळ यांच्या रॅलीत रामदास आठवलेंचा सहभाग**

मुरलीधर मोहोळ यांनी कोरोना काळात चांगले काम केले. त्यामुळे पुणेकरांच्या मनात त्यांच्याबद्दल प्रेम आणि आत्मीयता आहे. कोरोना नंतर त्यांनी विकास कामांना गती दिली. त्याबरोबर शहराचा इतिहास आणि वारसा जपण्यासाठी त्यांनी केलेले काम कौतुकास्पद आहे. पुणे महापालिकेतील शिवाजी महाराजांचे स्मारक, महापालिकेत पहिल्यांदा स्थापन केलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा, माता रमाईचे स्मारक, फुले दांपत्याची समता भूमी, लहुजी वस्ताद साळवे यांचे समाधी स्मारक ही काही उदाहरणे आहेत. सर्व समग घटकांना बरोबर घेऊन जाणारा कार्यकर्ता अशी मोहोळ यांची प्रतिमा आहे, पुणेकरांनी त्यांना विक्रमी मताधिक्क्याने विजयी करावे असे आवाहन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले.

पुणे लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार मुरलीधर आण्णा मोहोळ यांच्या प्रचारार्थ पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघामध्ये आयोजित केलेल्या प्रचार फेरीत केंद्रीय मंत्री रामदास जी आठवले यांनी सहभाग घेतला. आमदार सुनील भाऊ कांबळे, मंगला मंत्री, उमेश गायकवाड, हिमाली कांबळे, सुशांत निगडे, संदीप लडकत, सनी मेमाणे जयप्रकाश पुरोहित उपस्थित होते.

## मोदी सरकारने राबविलेल्या धोरणांमुळे देशाचा विकास आणि महिलाशक्ती सक्षम झाली

### भाजप राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन. सी. यांचे प्रतिपादन

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : राष्ट्रीय सुरक्षा, शिक्षा, आत्मनिर्भर भारत, महिला सुरक्षा आणि महिला सक्षमीकरणासाठी मोदी सरकारने राबविलेल्या धोरणांमुळे देशाचा विकास आणि महिलाशक्ती सक्षम झाली आहे. देशातील कष्टकरी महिला राष्ट्रनिर्माणाची भूमिका बजावतात, त्यांच्या सन्मानार्थ मोदी सरकारने महिलांसाठी विविध योजना आणल्या असल्याचे मत भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन. सी. यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले.



महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहळ यांच्या प्रचारासाठी त्या पुण्यात आल्या होत्या. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत शायना एन. सी. बोलत होत्या. भाजपचे माजी सभागृहनेते गणेश बिडकर, माजी नगरसेवक दत्ता खाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख, आरपीआयचे शैलेंद्र चव्हाण, रासपचे संजय आल्हाट, युवा सेना शहर प्रमुख निलेश गिरमे, भाजप प्रदेश सचिव युवा मोर्चाच्या उपाध्यक्ष निवेदिता एकबोटे, महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर, सहप्रसिध्दी प्रमुख पुष्कर तुळजापुरकर आदी उपस्थित होते.

शायना एन. सी. म्हणाल्या, देशातील महिलांसाठी राबविलेल्या वेगवेगळ्या धोरणांमुळे महिला केवळ, क्रीडा उद्योग आणि राजकारणातच नव्हे तर राष्ट्रीय सुरक्षेमध्येही योगदान देत आहेत. एनडीए सरकारच्या काळात देशातील महिला शक्ती राफेल विमान उडवत आहे. मोदी सरकारने केंद्रीय राखीव दल आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामध्ये ३३ टक्के पदे महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला.

एनडीए सरकारच्या काळात स्टार्ट अप इंडिया योजनेअंतर्गत देशातील ५ बिगर शेती व्यावसायापैकी १ व्यवसाय महिला चालवत आहे. राज्यातील २० हजार उद्योजकांना १४ हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली. १ कोटी आदिवासी महिला अन्न सुरक्षा गटाच्या सदस्य झाल्या आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणावर आणि योजनांचे फायदे यामुळे ग्रामिण भागातील महिलांची प्रगती झाली असल्याचे शायना एन. सी. म्हणाल्या.

इंडि आघाडीचे पक्ष मतदारांना खुष करण्यासाठी सध्या वेगवेगळ्या घोषणा करत आहे. देशातील जनतेच्या मालमत्तेवर ५५ टक्के वारसा कर लादुन आई-वडील यांची आयुष्यभर साठवलेली संपत्ती आता काँग्रेस काढून घेण्याच्या प्रयत्नामध्ये आहे असेही त्या म्हणाल्या.

बारामतीमधील अनेक गावे दुष्काळाच्या समस्येमध्ये आहेत. सुप्रिया सुळे यांना बारामतीच्या महिलांना सक्षम करु शकल्या नाहीत. शरद पवार यांच्या मते सुन ही कुटूंबातील सदस्य नाही. गंमत अशी आहे की पवार यांना इटालियन सुनेशी युती करण्यास तयार आहेत पण पवार कुटूंबाची सुन सुनेत्रा पवार यांना कुटूंबातील सदस्य म्हणून स्विकारु शकत नाहीत. अजित पवार यांनी बारामतीचा विकास केला आहे.संपुर्ण राज्याच्या विकासासाठी कटिबध्द असल्याचे शायना एन. सी. म्हणाल्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99